क्र.९/जिपुअ/क.लि.रो.पा/कावि 074 /२०२०.
जिल्हाधिकारी नागपूर यांचे कार्यालय,
नागपूर, दिनांक : 11 जून २०२०.

# जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
## (पुरवठा शाखा)
## ई-निविदा सूचना

कोविड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव - लॉकडाऊन परीस्थीतीत मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी जनहित याचिका १३ / २०२० मधील न्याय निर्णयानुसार नागपूर जिल्हयातील तहसिल स्तरावरील तसेच नागपूर शहरातील सर्वेक्षणा अंती शिधापत्रिका नसल्याची ओळख पटलेल्या समाजातील अत्यंत गरजू लाभार्थ्यांना जिवनावश्यक वस्तुची किट रास्तभाव दुकानामार्फत मोफत स्वरुपात वाटप करण्याकरीता सदर जिवनावश्यक वस्तुच्या किटमधील साहित्य खरेदी संबंधी अल्पनिवीदा सुचनाव्दारे दिनांक १२/०६/२०२० ते दिनांक १५/०६/२०२० रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत ई निवीदा (ऑनलाईन) पदधतीने मागविण्यात येत आहे. विहित मुदतीत प्राप्त न होणा-या तसेच अटी पुर्ण न करणा-या व निवीदाकाराचे अटीयुक्त निवीदा अपात्र ठरविण्यात येतील.

मुदतीत व विहित प्रमाणात प्राप्त निविदा जिल्हाधिकारी, नागपूर अगर त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष दिनांक १६-०६-२०२० रोजी दुपारी १२-०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे उघडतील. त्यावेळी सर्व इच्छुक निविदाकारांनी किंवा त्यांचे अनुपस्थितीत त्यांनी लेखी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींनी हजर राहावे.

निविदा फॉर्म व निविदासंबंधी **अटी व शर्तीची** प्रत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदा फॉर्म व अटी व शर्ती जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांचे संकेतस्थळावर दिनांक १५/०६/२०२० सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत पाहावयास उपलब्ध असेल. निविदा फॉर्मची किंमत रु.१०,०००/-(अक्षरी रु.-दहा हजार फक्त) एवढी असून सदरहु फि ऑनलाईन भरणे आवश्यक आहे.

## निवीदा प्रक्रीयेचे वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यवाहीचे टप्पे | टप्पे पुर्ण करण्याकरीता शेवटचा दिनांक |
|---|---|---|
| १ | ई निवीदा प्रसिध्द करणे | दिनांक १२-०६-२०२० |
| २ | ई निवीदेची सर्व प्रक्रिया राबविणे | दिनांक १२-०६-२०२० ते १६-०६-२०२० |
| अ) | निवीदा सादर करावयाचे अंतीम दिनांक व वेळ | दिनांक १५-०६-२०२०रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत |
| ब) | निवीदा उघडणे | दिनांक १६-०६-२०२० रोजी दु. १२.०० वाजेपर्यंत |
| ३ | यशस्वी निवीदाकाराबरोबर करारनामा करणे व काम सुरु करण्याचे दिनांक | निवीदा मंजूर झाल्यानंतर दोन दिवसाचे आत. |

जिल्हाधिकारी,
नागपूर